# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२
E-mail :- desk12@dtemaharashtra.gov.in internet:- www.dtemaharashra.gov.in


ईमेलद्वारे

क्रमांक : १२(१)/आस्था/२०१९/१९९
दिनांक : 30 SEP 2019

प्रति,
१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने संघटनेला मान्यता मिळणेबाबत

संदर्भ : शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकिर्ण-१११९/(१२७/१४)/तांशि-२, दि. २०.७.२०१९

उपरोक्त विषयांकित शासन पत्र या संचालनालयास प्राप्त झाले आहे, सोबत प्रत जोडली आहे कृपया पहावी.

संदर्भिय पत्रान्वये शासनाने कळविल्यानुसार, तंत्रशिक्षण संबंधीत शैक्षणिक संस्थांमधील अधिकारी/ कर्मचारी यांचेशी संबंधीत संवर्ग निहाय संघटनांची अद्ययावत व सविस्तर माहिती सादर करणेबाबत शासनाचे निर्देश त्यामध्ये या विभागातील मान्यताप्राप्त, मान्यता नसलेल्या तथा मान्यता रद्द केलेल्या संघटनांबाबतची तपशिलवार माहिती शासनास सादर करावयाची आहे. या संचालनायाकडे असोशिएशन ऑफ क्लास थ्री मिनीस्ट्रीयल एम्प्लॉईज ऑफ द डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन इन ग्रेटर मुंबई ही संघटना मान्यताप्राप्त संघटना आहे. मात्र आपल्या स्तरावर सदर शासन निर्णयाप्रमाणे काही संघटना मान्यताप्राप्त असतील वा नोंदणीकृत मान्यतेसाठी त्या संघटनांचे आपल्याकडे प्रस्ताव असतील तर त्याबाबतची तपशिलवार माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी, ही माहिती सादर करताना खालील मुद्दे विचारात घ्यावेत.

१) मान्यता प्राप्त संघटना,
२) मान्यता प्राप्त नसलेल्या परंतु कार्यरत असलेल्या संघटना,
३) मान्यता रद्द करण्यात आलेल्या संघटना किंवा रद्द करावयाच्या असलेल्या संघटना,
४) संवर्गनिहाय संघटना (वर्ग १ ते वर्ग ४),
५) शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेल्या संघटना किंवा आपल्या स्तरावर प्रस्ताव प्राप्त असलेल्या संघटना,
६) राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित अधिकारी संघटना

उपरोक्त माहिती सादर करण्याबाबत प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

आ/२०१९/३अ
१०/१२/१९

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
17 DEC 2019
आवक क्र.....९२६६६...

(प्रा.डॉ. नाईक)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

...sanghatana

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/संघटनामाहिती/२०१९/5272
दिनांक : 17 DEC 2019

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयाचे पत्र क्र. १२(१)/आस्था/२०१९/१९९, दि. ३०/०९/२०१९ चे अवलोकन करण्यात यावे. त्यामध्ये सूचित केल्यानुसार व मुद्देनिहाय संघटनांबाबतची माहिती तात्काळ सादर करावी. सदरची माहिती या कार्यालयास दिनांक २० डिसेंबर २०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२

E-mail :- desk12@dtemaharashtra.gov.in ईमेलद्वारे

internet:- www.dtemaharashra.gov.in

क्रमांक : १२(१)/आस्था/२०१९/१९९

दिनांक : 30 SEP 2019

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय : तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने संघटनेला मान्यता मिळणेबाबत

संदर्भ : शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र. संकिर्ण-१११९/(१२७/१४)/तांशि-२, दि. २०.७.२०१९

उपरोक्त विषयांकित शासन पत्र या संचालनालयास प्राप्त झाले आहे, सोबत प्रत जोडली आहे कृपया पहावी.

संदर्भिय पत्रान्वये शासनाने कळविल्यानुसार, तंत्रशिक्षण संबंधीत शैक्षणिक संस्थांमधील अधिकारी/ कर्मचारी यांचेशी संबंधीत संवर्ग निहाय संघटनांची अद्ययावत व सविस्तर माहिती सादर करणेबाबत शासनाचे निर्देश त्यामध्ये या विभागातील मान्यताप्राप्त, मान्यता नसलेल्या तथा मान्यता रद्द केलेल्या संघटनाबाबतची तपशिलवार माहिती शासनास सादर करावयाची आहे. या संचालनायाकडे असोशिएशन ऑफ क्लास थ्री मिनीस्ट्रीयल एम्प्लॉईज ऑफ द डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन इन ग्रेटर मुंबई ही संघटना मान्यताप्राप्त संघटना आहे. मात्र आपल्या स्तरावर सदर शासन निर्णयाप्रमाणे काही संघटना मान्यताप्राप्त असतील वा नोंदणीकृत मान्यतेसाठी त्या संघटनांचे आपल्याकडे प्रस्ताव असतील तर त्याबाबतची तपशिलवार माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी, ही माहिती सादर करताना खालील मुद्दे विचारात घ्यावेत.

१) मान्यता प्राप्त संघटना,
२) मान्यता प्राप्त नसलेल्या परंतु कार्यरत असलेल्या संघटना.
३) मान्यता रद्द करण्यात आलेल्या संघटना किंवा रद्द करावयाच्या असलेल्या संघटना.
४) संवर्गनिहाय संघटना (वर्ग १ ते वर्ग ४),
५) शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेल्या संघटना किंवा आपल्या स्तरावर प्रस्ताव प्राप्त असलेल्या संघटना,
६) राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित अधिकारी संघटना

उपरोक्त माहिती सादर करण्याबाबत प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
17 DEC 2019
आवक क्र. ....१२६६६....

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

...erssanghatana

# महाराष्ट्र शासन

स्मरणपत्र क्र.-५

क्र. संकिर्ण-१११९/(१२७/१४)/तांशि-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई -३२
दि. २० जुलै, २०१९

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई — ०१

**विषय:- तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय व तत्सम संस्था तांत्रिक कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य या नावाने संघटनेला मान्यता मिळणेबाबत.........**

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाचे दि. १८ मार्च, २०१५ रोजीचे शासन परिपत्रक.
२. शासनाचे समक्रमांक दि. २४ जून, २०१९ रोजीचे स्मरणपत्र क्र. ४.
३. सामान्य प्रशासन विभागाचा क्र. संघटना १५१९/प्र.क्र. १८४/१६-अ,
दि. १० जुलै, २०१९ रोजीचा शासन निर्णय.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

२. संदर्भ क्रमांक १ येथे नमूद पत्राच्या शासन परिपत्रामधील मुद्दे विचारात घेऊन अहवाल सादर करण्याबाबत संदर्भ क्र. २ येथील स्मरणपत्र क्र. ४ अन्वये आपणांस अवगत करण्यात आलेले आहे. तथापी, अद्यापपर्यंत सदर प्रकरणाबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही. सबब, उपरोक्त संदर्भ क्र. १, २ व ३ येथील नमूद शासन परिपत्रक, स्मरणपत्र तसेच शासन निर्णयाचे अवलोकन करून त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्यात यावा. संदरहू प्रकरणी केवळ आपल्या अहवाला अभावी मागील ५ वर्षापासून शासनस्तरावर सदर प्रकरण प्रलंबित आहे.

३. तसेच प्रस्तुत प्रकरणी तंत्रशिक्षण संबंधीत शैक्षणिक संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी यांचेशी संबंधीत संवर्ग निहाय संघटनांची अद्ययावत व सविस्तर माहिती (मान्यता प्राप्त संघटना, मान्यता प्राप्त नसलेल्या परंतू कार्यरत असलेल्या संघटना, मान्यता रद्द करण्यात आलेल्या किंवा रद्द करावयाच्या असलेल्या संघटना, संवर्गनिहाय संघटना (वर्ग-१ ते वर्ग-४), तसेच राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित अधिकारी संघटना) शासनास तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी, हि विनंती.

आपला,

(प्रकाश भा. आव्हाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

"राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र" या महासंघास शासन मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. संघटना १५१९/प्र.क्र.१८४/१६-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जुलै, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. आरजीए-१०७५/एक्सआयआय, दि. २० सप्टेंबर १९७५.

२) राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र यांचे दि. १०.०५.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

"राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र" या महासंघाने दि. १०.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला. सदर महासंघास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

शासन निर्णय:-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दि. २० सप्टेंबर १९७५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद चार मधील तरतुदीनुसार "राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र" या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या औद्योगिकेत्तर महासंघास पुढील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अ) शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनांना मान्यता देण्यासंबंधात महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९ , नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियम महासंघाला यथास्थिती लागू राहतील. त्याचप्रमाणे अर्जासोबत अंतिमरित्या सादर केलेले नियम बंधनकारक राहतील. महासंघाला नियमात बदल करावयाचा असल्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

ब) शासनाने मान्यता दिलेल्या राज्य सरकारी गट-ड कर्मचाऱ्यांच्या संघटनांनाच महासंघाचे सभासदत्व राहील. महासंघास मान्यता दिल्यानंतर, महासंघातील एखाद्या घटक संघटनेची मान्यता शासनाने काढून घेतल्यास, अशा संघटनेचे सभासदत्व महासंघातून आपोआप रद्द होईल. तसेच नवीन संघटनेस शासनाने मान्यता दिल्यास त्या संघटनेस महासंघाचे सभासद होता येईल. नवीन सभासदत्वाची माहिती महासंघ शासनास वेळोवेळी देईल. महासंघातील शासन मान्यताप्राप्त घटक संघटनांची यादी सोबतच्या सहपत्रामध्ये देण्यात आली आहे.

क) महासंघाचे सभासदत्व असलेल्या घटक संघटनांना एका वेळी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या एकाच महासंघाचे सभासद होता येईल.

ड) महासंघाने आपले वार्षिक लेखापरीक्षण सनदी लेखापालाकडून करुन घेणे बंधनकारक आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७१०१४४८५६३६०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

(टि. वा. करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव, (विधान परिषद),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८. प्रधान सचिव, (विधान सभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई.
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
११. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, नविन प्रशासन भवन, १ ला मजला, मुंबई.
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, टेलिफोन एक्स्चेंज भवन, कुपरेज, मुंबई.
१४. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
१५. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती).

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन निर्णय प्रसिध्द करण्यात यावा.**

१७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१९. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२०. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये.
२१. श्री. एम.एम. पठाण ऊर्फ भाऊसाहेब पठाण, अध्यक्ष, गाळा नं. ६ व २, नवीन प्रशासन भवन आवार, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२. ( घटना व नियमांच्या साक्षांकित प्रतींसह )
२२. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संघटना १५१९/प्र.क्र.१८४/१६-अ, दि. १० जुलै, २०१९ सोबतचे सहपत्र

**राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, महाराष्ट्र" या महासंघातील**

**शासन मान्यता प्राप्त घटक संघटनांची यादी**

१) महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटना, मुंबई जिल्हा

२) नाशिक जिल्हा शेतकी खाते चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना, नाशिक

३) मंत्रालय चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटना

४) मंत्रालय उपाहार गृहे चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना, मुंबई

५) महाराष्ट्र न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना

६) महाराष्ट्र राज्य लेखा व कोषागारे गट ड कर्मचारी संघटना, मुंबई

**************************